महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-400 614

दूरध्वनी क्र.022-22850471 Email ID : directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र. राव्यक-ग्रागृ/ बांध/१४०/२०२१ दिनांक: १८.०५.२०२१

प्रति,
कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय :- ‘महाआवास अभियान- ग्रामीण’ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत आवास योजनांकरिता घरकुल रंगसंगतीबाबत.

संदर्भ :- “महा आवास अभियान- ग्रामीण” ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.: प्रआयो-२०२०/प्र. क्र.१०७/योजना-१०, दि.१९.११.२०२०

राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी दि. २० नोव्हेंबर, २०२० पासून राज्यात 'महा आवास अभियान-ग्रामीण' राबविण्यात येत आहे. अभियानामधे उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना विविध स्तरावर पुरस्कार देखील देण्यात येणार आहेत. उपरोक्त संदर्भान्वये “महाआवास अभियान- ग्रामीण” मधील परिशिष्ट-ब मधे सर्वोत्कृष्ट घरकुलाबाबत नमूद केले आहे, ज्यामध्ये रंगरंगोटी असलेल्या घरकुलाकरीता ४ गुण निश्चित देखील करण्यात आले आहेत. यास्तव योजनांतर्गत बांधण्यात आलेली घरकुले स्वच्छ व सुंदर दिसण्यासाठी समान प्रकारची रंगसंगती असावी या दृष्टीकोनातून पुढीलप्रमाणे घरकुल रंगसंगती निश्चित करण्यात आली आहे.



प्रस्तावित रंगसंगती


प्रस्तावित घरकुल - पर्याय १


प्रस्तावित घरकुल - पर्याय २

तरी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना आणि आदिम आवास योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत बांधण्यात आलेली घरकुले एकसमान दिसावीत, या उद्देशाने वर दिलेल्या आराखड्याप्रमाणे रंगसंगतीचा वापर करता येऊ शकेल. सदर रंगसंगती वापरणे हे लाभार्थ्यास बंधनकारक नसून रंगसंगतीचा वापर करणे बाबतचा अंतिम निर्णय हा लाभार्थ्यांचा राहील.

या अनुषंगाने, ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गुणवत्ता आणण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्तावित घरकुल रंगसंगतीचा वापर करणेबाबत आपण आपले स्तरावरून खालील यंत्रणाना योग्य ते मार्गदर्शन करावे.

**(डॉ. राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रत-

१. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव सादर.
३. उपायुक्त (विकास ), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.